N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर **P.S.**(ठाणे): पन्हाळा **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0109 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/06/2019 20:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार
**Time Period** (कालावधी): पहर 5
**Date From** (दिनांक पासून): 21/06/2019
**Date To** ( दिनांक पर्यंत): 21/06/2019
**Time From** (वेळेपासून): 12:24 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:03 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 21/06/2019 **Time** (वेळ): 20:19 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद 019 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 21/06/2019 20:19 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पन्हाळा पोलीस ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. तुकाराम काळु जानकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1997 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):
**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कणेरी पैकी धनगरवाडा,पन्हाळा ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कणेरी पैकी धनगरवाडा,पन्हाळा ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिष बापुसो खुटावळे | | | 1. प्लाट नं,सव्हे नं 76,,प्लाट नं 14/15, इंगवले काल,फुलेवाडी, कोल्हापूर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक- 21/06/2019 मी तुकाराम काळु जानकर, वय 22, व्यवसाय - मजुरी, रा. कणेरी पैकी धनगरवाडा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबिय एकत्रित राहाणेस आहे. मी शिरोली जकात नाका, कोल्हापूर येथे हमालीचे काम करतो. माझे आईवडील गावी शेती व्यवसाय करतात. आमचे घराचे मागील बाजूस माझे चुलते बंडा आप्पाजी जानकर हे त्यंाचे कुटूंबियांसह राहाणेस आहेत. दि.07/06/2019 रोजी माझे व माझे चुलते,चुलती आणि त्यंाचा मुलगा यांचेशी संडास बांधकामाचे जागेवरुन झालेल्या भांडणाबाबत मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे तक्रार दिलेली आहे. सदर तक्रारीनुसार कारवाई करणेसाठी पन्हाळा पोलीस ठाणे येथील पोलीस हवालदार श्री.खुटावळे यांनी माझेकडे रु.3,000/- लाच मागणी केली. परंतू त्यंाचे मागणीप्रमाणे लाच देणेची माझी ईच्छा नव्हती. म्हणून मी दि. 21/06/2019 रोजी माझा मित्र श्री.अभिमन्यु अर्जुन पाटील,रा.बांदीवडे, ता.पन्हाळा यांचे मार्फतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत सांो यांचेषी फोनवर संपर्क साधून माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली. तसेच आज रोजी मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार खुळावळे यांना भेटण्यास जाणार आहे. मला कोल्हापूर येथील आपले कार्यालयात तक्रार देण्यासाठी येणेकरीता फार वेळ जाणार आहे. तरी आपण पन्हाळा येथे या, तेथे मी आपणास माझी लेखी तक्रार आपणाकडे देतो अशी विनंती केली. तेव्हा श्री.बुधवंत यांनी पन्हाळा येथे आपण आम्हास कोठे भेटणार? याबाबत मला विचारणा करता, पन्हाळा गिरीस्थान नगरपरिषद हाल येथे मी व माझे मित्र अभिमन्यु पाटील थांबतो असे सांगितले.त्यानंतर दुपारी 12.00 वा. आम्ही थांबलेल्या ठिकाणी पन्हाळा गिरीस्थान नगरपरिशद हाल परिसरात पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत साहेब त्यांचेकडील षासकीय टाटा सुमो गाडीतून पंच व त्यांचे स्टाफसह आले. त्यांनी आमचेजवळ येवून आम्हास नाव,पत्ता विचारता आम्ही दोघांनी आमची नावे सांगितली. पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत साहेबांनी आम्हास त्यांची व त्यांचे सोबत असलेल्या पंच आणि स्टाफची आम्हास ओळख करुन दिली. त्यावेळी मी पोलीस हवालदार श्री. खुटावळे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यांनी माझा अर्ज वाचून पाहीला व माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच बुधवंत साहेबांनी देखील तक्रारीखाली सही केली.श्री. बुधवंत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना पन्हाळा पोलीस ठाणे येथील पोलीस हवालदार खुळावळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी पोलीस हवालदार खुटावळे यांचेकडे जाताना माझेसोबत पंच श्री. माने यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नविन सनडिस्क कंपनीचे 8

जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खा◌◌◌त्री करुन दिली. मला व पंच श्री.माने यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या.श्री.बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर 12.23 वा.चालू करुन तो माझे गळयात अंगावरील टि शर्टचे आतील बाजुस दोरीच्या सहायाने अडकवून दिला व मला आणि पंच श्री.माने यांना माझेकडील हिरो स्प्लेंडर मोटर सायकल नंबर- डभ्.09ध्क्छ.7048 यावरुन पन्हाळा पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार खुटावळे यांची भेट घेणेकरीता पाठविले. तेथे मी पोलीस हवालदार श्री.खुटावळे यांची भेट घेवून पुन्हा पन्हाळा गिरीस्थान नगरपरिशद हाल,पन्हाळा येथे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा श्री.बुधवंत सा◌ो यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 12.37 वा. बंद करुन ताब्यात घेतला. श्री.बुधवंत सा◌ो यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे जावून पोलीस ठाणे परिसरात पोलीस हवालदार खुटावळे यांची भेट घेवून त्यांचेशी मी पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीबाबत चर्चा केली असता, खुटावळे यांनी मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे माझे चुलते व इतर यांचेविरुध्द दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचेविरुध्द कारवाई करणेसाठी लाच रक्कम मागणी करुन लाच रक्कम लागलीच घेवून येणेस सांगितलेबाबत हकिकत सांगितली. श्री.बुधवंत सा◌ो यांनी डिजिटल रेकार्डरमधील माझे आणि पोलीस हवालदार खुटावळे यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.माने आणि माझे सांगणेवरुन पोलीस हवालदार खुटावळे यांनी मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे माझे चुलते व इतर यांचेविरुध्द दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचेविरुध्द कारवाई करणेसाठी लाच रक्कम मागणी करुन लाच रक्कम लागलीच घेवून येणेस सांगितलेचे निश्पन्न झाले.लागलीच श्री.बुधवंत सा◌ो यांनी सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असले◌ेचे सांगितले. त्यावेळी मला श्री.बुधवंत सा◌ो यांनी पोलीस हवालदार खुटावळे यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले रु.500/-दराच्या 3 नोटा मिळून रु.1,500/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा श्री.बुधवंत सा◌ो यांनी नोटांचे नंबर्स लिहून घेवून त्या नोटांना षासकीय टाटा सुमो गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पोका देसाई यांचेमार्फत अन्थ्रासिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यावेळी लाच रक्कम रु. 1,500/- माझे ट◌्रक पंटचे पुढील उजवे खिषात घडी करून ठेवली. तेव्हा माझेकडे पोलीस हवालदार खुटावळे यांनी तक्रारीत नमुदप्रमाणे रु.3,000/- रक्कमेची मागणी केल्यास उर्वरित लाच रक्कम रु.1,500/- आरोपीविरुध्द कारवाई झालेवर देतो असे खुटावळे यांना सांगणेबाबत श्री.बुधवंत सा◌ो यांनी सुचना दिली. तसेच मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचार्यांना सापळ्याचे अनुषंगाने श्री.बुधवंत सा◌ो यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री.बुधवंत सा◌ो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर दुपारी 13.54. चालु करुन तो माझे गळ्यात टि षर्टचे मागील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच माने यांना हवालदार खुटावळे यांची पन्हाळा पोलीस ठाणे येथे भेट घेण्यासाठी पाठविले. आम्ही पन्हाळा पोलीस ठाणे आवारात गेलो. आमचे पाठोपाठ श्री.बुधवंत सा◌ो व त्यांचे सोबतचा स्टाफ असे पोलीस ठाणे समोरील आवारात आले. तेव्हा खुटावळे मला पोलीस ठाणे समोरील रिकामे जागेत दिसले. तेथे मी त्यांची भेट घेतली असता, खुटावळे यांनी माझेकडे हाताचे इषायाने पैषाबाबत विचारणा केली. तेव्हा मी माझे ट्रक पंटचे खिषातील लाच रक्कम रु.1,500/- खुटावळे य◌ाचेसमोर धरली असता, त्यांनी ती उजवे हाताने स्विकारुन त्य◌ाचे पंटचे पुढील उजवे खिषात ठेवली. त्यावेळी मी खुटावळे यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा केला. त्यावेळी खुटावळे तेथून पोलीस ठाणे इमारतीत गेले. तेव्हा श्री.बुधवंत सा◌ो व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी पोलीस ठाणेमध्ये जावून खुटावळे यांना पकडले. त्यांचेकडून पंच साक्षीदार यांचेसमक्ष श्री.बुधवंत सा◌ो यांनी लाच रक्कम रु.1,500/- जप्त केली आहे. सदर प्रकरणाबाबत श्री.बुधवंत सा◌ो यांनी दि.21/06/2019 रोजी सविस्तर सापळा पंचनामा केला असून पंचनाम्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. मी पन्हाळा पोलीस ठाणे येथे दिलेले तक्रारीवरून दाखल अदखलपात्र गुन्हयामध्ये त्यातील आरोपी माझे चुलते व इतर यांचेविरूध्द कारवाई करणेसाठी पन्हाळा पोलीस ठाणे येथील पोलीस हवालदार सतिष खुटावळे यांनी आजरोजी लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यासा सांगितले होते.त्याप्रमाणे लागलीच माझे चुलते व इतरांवर अदखलपात्र गुन्हयामध्ये कारवाई करणेसाठी पोलीस हवालदार सतिष खुटावळे यांनी पन्हाळा पोलीस ठाणे परिसरात माझेकडून रु. 1,500/- लाच रक्कम स्विकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत व त्यांचे स्टाफने पकडले आहे. श्री. सतिष बापुसो खुटावळे, पोलीस हवालदार ब.नं. 1044, पन्हाळा पोलीस ठाणे, कोल्हापूर यांचेविरुध्द वरीलप्रमाणे फिर्याद आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): ambrushi dattatray phadtare(I (Inspector)) / DGPADPM6604 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): ambrushi dattatray phadtare
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPADPM6604